प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९-१९८२)

ऋषींनी शिकवले तसे
आम्ही ध्यान शिकवतो.

## प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

## प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

## प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

## सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

## महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

## गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य होते. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्त ऋषींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

## सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

## दृढ वचन

- ★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- ★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 14 Issue 11 August 2022 (Marathi Monthly) Rs. 25

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद

(जानेवारी २०१२ या अंकामधून, अनुवाद : जयंत देशपांडे)

आपण नूतन वर्षात प्रवेश केला आहे. आपण २०१२ सालात प्रवेश केला आहे. २०११ साल हे आरंभांचे वर्ष होते. २०१२ साल हे घडामोडींचे वर्ष असेल.

२०११ सालात आपल्याला नव्या ऊर्जा मिळाल्या. आपण जागृती होत असलेली पाहिली. आपण कित्येक सत्ये सामोरी येताना पाहिली. कित्येक ठिकाणी होणाऱ्या उठावांचे पण आपण साक्षीदार होतो. २०११ सालात चैतन्यात पुष्कळ स्थित्यंतरे झाली. आपण नवे आरंभ अनुभवले. हे सर्व वैयक्तिक पातळीपासून ते जागतिक पातळीपर्यंत वेगवेगळ्या पातळ्यांवर घडले. मागील वर्षात नाट्यमय असे बदल घडले नाहीत. तसे बदल अपेक्षितही नव्हते. प्रलय म्हणजेच बदल, ही एकाच वेळी घडणारी घटना नसून, ही एक हळूहळू घडणारी प्रक्रिया आहे. प्रलय म्हणजे परिवर्तनाचा विस्फोट नसून एक हळूहळू घडत जाणारा बदल आहे.

२०११ सालात ज्या प्रक्रियांना सुरुवात झाली, त्या प्रक्रिया २०१२ सालात, चालू राहताना आपण पाहू. लोकांमध्ये आणखी जास्त प्रमाणात आणि आणखी उच्च पातळीची जागृती घडून येईल. आणखी मोठ्या प्रमाणावर सत्ये प्रकाशात येतील. आणखी मोठ्या प्रमाणावर उठाव होतील. चैतन्यात आणखी जास्त प्रमाणात स्थित्यंतरे घडतील. सर्व स्तरांवर जास्त प्रमाणात प्रारंभ होतील. प्रलय म्हणजेच बदल, हा चालू राहील.

नवयुगाची पहाट झालेली आहे आणि ते आपल्याला मायेच्या आणि प्रेमाच्या हाताने अतिशय हळुवारपणे त्याच्या कुशीत घेऊ लागले आहे. नवयुगाच्या वास्तवांना आपण, सध्या घडत असलेल्या जागृतीमुळे आणि विस्तारलेल्या जाणिवेमुळे जाणू शकू. आपण आपल्यात आध्यात्मिक परिवर्तन घडवून, शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी, विश्वाने देऊ केलेल्या संधी ओळखू शकू. आपण आपल्यात जागृत झालेल्या विवेकामुळे परिवर्तनाची आणि नवयुगातील जीवनाची निवड करू शकू.

२०१२ सालाच्या अखेरीस पुष्कळ घडामोडी अपेक्षित आहेत. संभाव्य भीषण विनाशाची भीती लोकांमध्ये पसरलेली आहे. काही घटना निश्चितच घडतील. पण त्यातून होणाऱ्या विनाशाची आपण भीती बाळगू नये. आपण जर आपल्यात परिवर्तन घडवले आणि नवयुगाची निवड केली तर आपण कठीण प्रसंगांतून सहज निभावून जाऊ. आपले आध्यात्मिकीकरण ही आपल्याला भविष्याकडे नेणारी एक ट्रेन आहे. आपण जर ध्यान केले तर सत्य आपण जास्त चांगल्याप्रकारे समजू शकतो, आत्मसात करू शकतो. ज्ञानाने आपल्याला विवेक आणि धीर मिळतो.

ध्यान म्हणजे, ज्ञान संपादन करण्यासाठी, स्वतःला सामर्थ्यवान बनवण्यासाठी आणि स्वतःचे भविष्य घडवण्यासाठी एक संधी आहे. ध्यान करून आपण स्वतःसाठी आणि या पृथ्वीसाठी उज्ज्वल नियती घडवू शकू. आपण जर आपल्या अवतीभवती नजर फिरवली तर आपल्या लक्षात येईल की खूप लोक ध्यान करू लागले आहेत. खूप लोकांनी, अजाणतेपणे का असेना, या जगाचे भवितव्य घडवण्यासाठी कार्य करायला सुरुवात केलेली आहे.

पुष्कळ प्रकाश-कार्यकर्ते, प्रकाश प्रवाहित करून पसरवत आहेत. हा प्रकाश म्हणजे भौतिक प्रकाश नव्हे, तर अतिसूक्ष्म प्रकाश होय, ज्यामधून संपूर्ण सृष्टीने जन्म घेतला आहे. ह्या प्रकाशाजवळ प्रेम, शांती आणि महान प्रज्ञा आहे. ह्या प्रकाशाजवळ महान विवेक आहे. हा प्रकाश पसरवल्यानंतर सर्वांपर्यंत पोहोचतो, या पृथ्वीवरील प्रत्येकजण व प्रत्येक वस्तूपर्यंत पोहोचतो. माणसे, निसर्ग आणि प्रत्येक वस्तूमात्र हा प्रकाश ग्रहण करतात; त्यांना समजते की, आपण एका महान नवयुगाकडे वाटचाल करीत आहोत आणि ते त्यासाठी स्वतःला तयार करतात.

२०१२ साली लोक प्रकाशाबद्दल अधिक जागरूक होतील. ते प्रकाश अनुभवतील आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये परिवर्तन घडेल. आम्ही २००८ साली 'लाइट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट'ला सुरुवात केली. अनेक लोक रोज प्रकाश चॅनल (प्रवाहित) करीत आहेत. आम्ही शाळांसोबत प्रकाश प्रवहनाचे कार्य करू लागलो आणि आतापर्यंत १८ लाखांपेक्षाही जास्त मुलांनी प्रकाश प्रवहन केले आहे आणि लाखो मुले रोज प्रकाश प्रवाहित करीत आहेत. प्रकाश प्रवहनानंतर लोकांच्या आणि त्यांच्या सभोवतालच्या जीवनात आश्चर्यकारक बदल होताना आम्ही पाहत आहोत.

प्रकाश आपली आशा आहे. आपली शक्ती आहे. आपले भविष्य आहे. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर-बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : ९९०००७५२८० (सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत)
इ-मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता
नियमित वर्ग – सकाळी ११ वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स,
फेज १, जे. पी. नगर
श्री विघ्नेश्वर मंदिर, १ एन. ब्लॉक,
५ व ६ क्रॉस, राजाजीनगर
इंडियन हेरिटेज अकॅडमी,
ब्लॉक ६, कोरामंगला

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी
स्टेज २

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी
स्टेज २

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)
सप्तर्षी ध्यान केंद्र

तसेच, दर महिन्याचा तिसऱ्या रविवारी सकाळी ११ ते ११.३० पर्यंत प्रकाश प्रवहनाचे मार्गदर्शित ऑनलाईन सत्र आयोजित करण्यात येईल, जे सर्वांसाठी खुले असेल. खाली दिलेल्या लिंक्सद्वारे ह्या सत्रात सहभागी होता येईल:

https://www.facebook.com/lightchannels
https://www.lightagemasters.com/lc_live
https://youtube.com/RevolutionByLight

Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी) वार्षिक वर्गणी रू. ३००/– ड्राफ्ट कृपया मानसा लाइट एज फाउंडेशन च्या नावाने काढावा. कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



मे २०२२ मधे तपोनगर येथे रहिवाशांच्या भेटीत गुरुजींची जयंती साजरी करण्यात आली.

## काही ठळक घडामोडी

- २८ ऑगस्ट रोजी महर्षी अमरांच्या महासमाधी दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. ह्या कार्यक्रमात सहभागी होण्याची आपली इच्छा असल्यास कृपया २६ ऑगस्ट पर्यंत मानसा कार्यालयात नोंदणी करावी.
- ह्या कार्यक्रमादरम्यान "Master Pupil Talks – Vol 1" या पुस्तकाच्या तमिळ भाषेतील अनुवादाची ई–आवृत्ती प्रकाशित करण्यात येईल.
- १३ जुलै रोजी गुरु पौर्णिमा साजरी करण्यासाठी ध्यानसाधक मेडिटेशन हॉलमध्ये एकत्र जमले आणि त्यांनी परब्रह्माच्या ऊर्जा संपूर्ण जगास प्रवाहित केल्या.
- शंबलातील विशेष ऊर्जा ग्रहण करण्यासाठी शंबला गटातील सदस्य तपोनगरातील मेडिटेशन हॉलमध्ये १० जुलै रोजी एकत्र जमले.
- 'रा' देवतेकडून विशेष ऊर्जा ग्रहण करण्यासाठी १७ जुलै रोजी 'रा' गटातील सदस्य मेडिटेशन हॉलमध्ये एकत्र जमले. ■

### श्रीकृष्ण जन्माष्टमीसाठी ध्यानाचे विशेष तंत्र

आपल्या समोर निळ्या प्रकाशाच्या एका प्रचंड गोलाची किंवा निळ्या प्रकाशरूपी भगवान श्रीकृष्णांची कल्पना करा. एका प्रकाशकणाच्या रूपात त्या प्रकाशगोलात किंवा प्रकाशमय भगवान श्रीकृष्णांच्या शरीरात प्रवेश करून त्यांचा अनुभव घ्या. ह्या तंत्राचा सराव कितीही वेळ आणि दिवसातून कितीही वेळा करता येतो. श्रीकृष्ण जन्माष्टमीपासून दहा दिवस आपण आपल्या दैनिक ध्यानाऐवजी ह्या तंत्राचा अभ्यास करू शकता.

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०५ | शुक्रवार | शुक्लाष्टमी |
| ०७ | रविवार | शुक्ल दशमी |
| १२ | शुक्रवार | महालक्ष्मी पूजन / पौर्णिमा |
| १९ | शुक्रवार | श्रीकृष्ण जन्माष्टमी |
| २५ | गुरुवार | महर्षी अमरांचा महासमाधी दिवस / मास शिवरात्री |
| २७ | शनिवार | अमावास्या |
| २८ | रविवार | महर्षी अमरांचा महासमाधी दिवस कार्यक्रम |
| ३० | मंगळवार | गौरी देवी पूजन |
| ३१ | बुधवार | गणपती पूजन |

## तपोनगरातील कार्यक्रम

दर रविवारी – व्याख्यान, सकाळी ११ ते १२ पर्यंत
– प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत

शुक्रवार १९ – श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त विशेष ध्यान, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत

रविवार २८ – महर्षी अमरांच्या महासमाधी निमित्त कार्यक्रम, सकाळी ११ ते दुपारी १२.३० पर्यंत

## महर्षी अमर महासमाधी कार्यक्रम

२९–८–२०२२, रविवार

सकाळी ११ वाजता स्वागत
वरिष्ठ साधकांचे व्याख्यान
विशेष ध्यान
दुपारी १२.३० वाजता प्रसाद

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव आणि अभिप्राय

संकलन : वैशाली जोशी, अनुवाद : वैशाली नितीन तरे

मी एक व्यवसायिक आहे. करोनाच्या काळामध्ये माझ्या समोर बऱ्याच समस्या होत्या आणि त्यातून बाहेर कसे पडावे सुचत नव्हते. ऑक्टोबर २०२१ मध्ये मी प्रकाश प्रवहन शिकलो, आणि मोठ्या विश्वासाने मी दररोज सकाळी व संध्याकाळी त्याचा सराव करण्यास सुरुवात केली. मला फारच अद्भुत अनुभव आले. प्रकाश प्रवहनामुळे घडलेली सर्वात चांगली गोष्ट म्हणजे माझ्या मनातील फालतू विचार कमी झाले. माझे मन अतिशय शांत झाले त्यामुळे मला योग्य निर्णय घेणे शक्य झाले. मी अनेक वर्षांपासून शेअर मार्केटची परीक्षा देण्याचा प्रयत्न करीत होतो पण यश येत नव्हते. डिसेंबर २०२१ मध्ये मी त्या परीक्षेत उत्तीर्ण झालो. याचे पूर्ण श्रेय मी प्रकाश प्रवहनाला देतो, कारण माझे मन आता खूप एकाग्र झाले आहे आणि माझा आत्मविश्वास वाढला आहे. घरातील लोकांबरोबर माझा संवाद चांगला होतो आहे, त्यामुळे घरात आनंदी वातावरण तयार झाले आहे. याचा फायदा म्हणजे मला व्यवसायासाठी भरपूर वेळ मिळू लागला आहे. तणाव व चिंता कमी झाल्यामुळे झोप खूप छान येऊ लागली आहे. माझे मन प्रसन्न झाले आहे आणि मी जीवनाचा आनंद घेऊ शकतो आहे.

– आशिष भुजबळ, एक प्रकाश प्रवाहक

प्रकाश प्रवहनाचा अनुभव सुंदर आहे, अगदी शब्दांच्या पलीकडचा आहे. मला निश्चिंत व आनंदी वाटते. मी प्रकाश प्रवहन करू शकले आणि त्याला माझ्यावर जादू करण्याची मुभा देऊ शकले. आता मी इतरांबद्दल अधिक सहानुभूतीशील आहे आणि कमतरता असूनही इतरांना व स्वत:ला स्वीकारू शकते आहे. हा एक अवर्णनीय अनुभव आहे. हे अनोखे तंत्र सर्वसामान्य लोकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल धन्यवाद.

– अर्चना कण्णन्, एक प्रकाश प्रवाहक

प्रकाश प्रवहनाची सत्रे मला मन:शांती देतात. ती मला एक चांगली भावना देतात की मी जास्त कष्ट न करता समाजासाठी काहीतरी करू शकतो आहे, तेही सोफ्यावर बसून!

– रविचंद्रन एम., एक प्रकाश प्रवाहक

मला आनंद आहे की प्रकाश प्रवहन करत असताना किमान त्या दहा मिनिटांसाठी तरी मी कोणत्याही विचारापासून मुक्त असते. त्या वेळी माझ्या मनाला व शरीराला दोघांनाही विश्रांती मिळते.

– चारुमती आर., एक प्रकाश प्रवाहक

प्रकाश प्रवहन अप्रतीम आहे. हे एक सोपे तंत्र आहे जे मला आराम देते.

– भुवना, एक प्रकाश प्रवाहक

प्रकाश प्रवहनाचा अनुभव खूपच छान आहे. जेव्हाकेव्हा मी प्रकाश प्रवहन करते, तेव्हा मला मनामध्ये शांतता जाणवते आणि कधीकधी मला झोपही येते. प्रकाश प्रवहन करताना मनाचे भरकटणे हळूहळू कमी होत आहे.

– विजया श्रीराम, एक प्रकाश प्रवाहक

मला प्रवहन करताना येणारा प्रकाशाचा अनुभव पूर्णत: आवडतो. जेव्हापासून मला आठवते, तेव्हापासून मी आध्यात्मिक मार्गावर आहे, आणि सतत एक साधक राहिले आहे. प्रवहन करणे माझ्यासाठी फारसे नवीन नाही पण मी यापूर्वी कधीही प्रकाश प्रवहन केलेले नाही. मला "मैत्री" प्रवाहित करण्याची सवय आहे, ज्याचा अर्थ आम्ही ध्यानानंतर सर्वांना शुभेच्छा, आशीर्वाद, शांती, सुसंवादित्व पाठवितो ज्याची परिणीती अतिशय शक्तीशाली सकारात्मक ऊर्जेमध्ये होते. मी "वर्ल्ड चॅनल्स डे" च्या दिवशी प्रकाश प्रवहनामध्ये सहभागी झाले आणि त्यातील प्रत्येक क्षण मला आवडला. तेव्हापासून मी प्रकाश प्रवहन करीत आहे. मला सर्वात जास्त या गोष्टीने आकर्षित केले आहे की याचे स्रोत थेट प्रकाश गुरू आहेत. माझ्या भावना स्पष्ट करण्यासाठी माझ्याकडे शब्द कमी पडत आहेत पण जेव्हा मी प्रकाश प्रवहन करते, तेव्हा ते सर्वसमावेशकता, शुभेच्छा आणि प्रकाश यांचे एकत्रीकरण असते. हा एक मुक्त प्रवाह असतो जो थांबविता येत नाही. या सुंदर प्रक्रियेची ओळख करून दिल्याबद्दल धन्यवाद!

– लक्ष्मी विश्वनाथ, एक प्रकाश प्रवाहक

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी, आपल्या अंत:करणातील चळवळ आहे. ही एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत, घोषणा फलक नाहीत, जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढच पुरेसे आहे. शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाश करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांतील अंध:काराला दूर करतो. त्यामुळे लोकांमध्ये परिवर्तन घडते. लोकांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूळ स्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्ज्वल भविष्य, आणि तो दिसत नसला तरी सर्वव्यापी आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगात परिवर्तन घडवूया.

प्रकाश प्रवाहित करून पसरवण्यासाठी, तुमच्या वर प्रकाशाच्या एका महासागराची कल्पना करा. मग कल्पना करा की, ह्या महासागरातून प्रकाशाचा एक झोत खाली अवतरत आहे आणि हा प्रकाश तुमच्या शरीरात प्रवेश करून त्याला पूर्णपणे भरतो आहे. एका मिनिटासाठी या प्रकाशाचा अनुभव घ्या. मग कल्पना करा की, हा प्रकाश तुमच्या शरीराबाहेर पडून हळूहळू तुमच्या घरात, मोहल्ल्यात, देशात आणि संपूर्ण जगात पसरतो आहे.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८-०५-२००८ रोजी सप्त ऋषींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवावा, ही विनंती.

वेब साईट: www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबलामध्ये राहणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वत:हून आपल्या ऐहिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

संकलन : शोभा राव, अनुवाद : वैशाली जोशी

नोव्हेंबर २००६

लोकांना आशीर्वाद हवे असतात आणि अर्थातच त्यासाठी त्यांना मला भेटायचे असते. जेव्हा आवश्यकता असेल, तेव्हा मी तुम्हाला भेटेन. तुम्ही गोंधळून जाऊ नका. तुम्ही गैरसमज करून घेऊ नका. जेव्हा मी तुम्हाला भेटत नाही, तेव्हा वाईट वाटून घेऊ नका. आणि केवळ मी तुम्हाला भेटत नाही म्हणून, तुमच्याकडे दुर्लक्ष होते आहे असे समजू नका. तुमच्याकडे अजिबात दुर्लक्ष केले जात नाहिये. लोकांना वारंवार न भेटण्याचा विचार, भौतिक पातळीवर मला प्रत्यक्षात येऊन भेटण्यापासून लोकांना परावृत्त करण्याचा विचार, हा तुम्हाला मला एका वेगळ्या पातळीवर भेटण्यास प्रोत्साहित करण्यासाठी आहे. तुम्हाला जर हे समजले नाही, तर तुम्हाला काहीही समजणार नाही. जेव्हा मी तुम्हाला भेटत नाही, तेव्हा ती एक निष्प्रेमाची कृती आहे असे समजू नका. काही महिन्यांपूर्वी, एक वृद्ध महिला, ज्या महर्षी अमरांसोबत होत्या, इथे मला भेटायला आल्या होत्या. त्या दिवशी मला वेळ नव्हता. आणि त्या न कळवता आल्या होत्या. त्या घाईत होत्या. त्या म्हणाल्या, "तुमचे गुरू खूप क्रूर आहेत. महर्षी अमर मला भेटले असते." अर्थात, अशा टीकांवर मला हसू येते. आणि महर्षी अमर किती वेळा लोकांना भेटले नाहीत हे त्यांना माहीत नाही. गोष्ट अशी आहे की, आपण कायम एकाच पातळीवर राहू शकत नाही. आपल्याला पहिल्या इयत्तेतून उत्तीर्ण होऊन दुसऱ्या इयत्तेत जावे लागते. आपण किती दिवस ह्या गोष्टींसाठी आसुसलेले राहणार, फक्त भौतिक पातळीवर भेटायचे आणि त्याच त्या गोष्टींबद्दल बोलत राहायचे? आपण वरच्या पातळीवर जाऊया. खरं तर, तुमच्या मनाविरुद्ध तुम्हाला वरच्या पातळीवर ढकलण्याचा प्रयत्न करणे हे माझे काम आहे. मी हे अत्यंत प्रेमाने करण्याचा प्रयत्न करत आहे. तुम्ही ते समजून घ्यावे अशी माझी इच्छा आहे. मी तुम्हा सर्वांना अशा टप्प्यावर पोहोचण्यास मदत करू इच्छितो, जेव्हा तुम्ही सूक्ष्म पातळीवर येऊन मला भेटाल, मला प्रश्न किंवा सल्ले विचाराल, माझ्याशी बोलाल. मी तुम्हाला समजावून सांगेन; मग तुम्ही परत जाल. आणि तुम्ही हे सर्व जाणीवपूर्वक करत असाल. मग तुम्ही ह्या वर्गांना येणाची अजिबात आवश्यकता राहाणार नाही. तुम्ही मला प्रत्यक्षात येऊन भेटण्याची अजिबात आवश्यकता राहाणार नाही, त्याची गरज नाही. मला तुम्हाला अशा टप्प्यावर ढकलायचे आहे. म्हणून मी तुम्हाला प्रत्यक्षात भेटण्यापासून परावृत्त करत असतो.

लोकं आशीर्वाद मागतात. हे आशीर्वाद ऋषींकडून मिळतात. माझ्याकडून नव्हे. मी फक्त एक वाहक आहे; मी एक निमित्त आहे. असे समजू नका की जेव्हा तुम्ही माझ्या समोर येऊन बसता, तेव्हाच तुम्हाला आशीर्वाद मिळतो, आणि जर तुम्ही मला भेटला नाही, तर तुम्हाला आशीर्वाद मिळणार नाही. तो भाग तुम्ही समजून घ्यावा अशी माझी इच्छा आहे. ज्या क्षणी तुम्हाला आशीर्वाद हवा असतो, त्या क्षणी तुम्हाला आशीर्वाद मिळतो. आपण ह्या गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. आणि ह्या गोष्टी समजून घेण्याची वेळ आता आली आहे. हा काही ध्यानसाधकांचा कोणतातरी सामान्य गट नाही. आपण सप्त ऋषींसारख्या महान सद्गुरूंच्या छत्रछायेखाली असलेले विशेष लोकं आहोत. पृथ्वीवरील हे एकमेव केंद्र आहे जिथे सप्त ऋषी थेट मार्गदर्शन करत आहेत आणि आपण सामान्य लोकांसारखे वागू शकत नाही आणि आपण सामान्य पातळीवर गोष्टी समजून घेणे चालू ठेवू शकत नाही. आपण वरच्या पातळ्यांवर कधी जाणार? हीच ती वेळ आहे. मी तुम्हाला सांगण्यासाठी इथे आहे. मी तुम्हाला गोष्टी समजावून सांगण्यासाठी इथे आहे. तुम्ही अधिक समजून घेतले पाहिजे. मी पुन्हा सांगतो, आशीर्वाद देणे ही कृपेची कृती आहे. ज्याक्षणी तुम्हाला तो हवा असतो, तुम्हाला तो मिळतो. तुम्ही आशीर्वाद मागायची गरज नाही. न विचारताच तुम्हाला आशीर्वाद मिळत असतात. आणि हे फक्त शब्द नाहीत. आम्ही फक्त असेच बोलत नाही. आमचा तसे म्हणण्याचा अर्थ असल्याशिवाय आम्ही शब्द वापरत नाही. हा काही राजकीय मेळावा नाही, जिथे लोक आश्वासने देतात पण ती पूर्ण करण्याचा त्यांचा हेतू नसतो. मी बोलतो तो प्रत्येक शब्द माझ्या हृदयातून येतो आणि त्याला इथे उपस्थित असलेल्या महान ऋषींची मान्यता असते. मी बेजबाबदारपणे बोलत नाही. कृपया हे समजून घ्यावे.

कुंडलिनी जागृत करणे आणि समाधी अनुभवणे हा एक मार्ग आहे. ऋषी सांगतात की, कुंडलिनी जागृत करणे तर सोडा, तुम्ही ध्यान न करता देखील समाधीचा अनुभव घेऊ शकता. ते म्हणतात, "तुम्ही ध्यान केले नाही तरी तुम्ही समाधी अनुभवू शकता. त्यासाठी मार्ग आहेत." प्रेम प्रकट करा. ते पुरेसे आहे. कोणत्याही एका शंबला तत्त्वाचा अभ्यास करा, तुम्हाला समाधीची अनुभूती होईल. लोकं ह्या गोष्टींमधे वेळ वाया घालवतात. त्यांना वाटते की कुंडलिनी जागृत करण्यातील अद्भुतरम्य भाग किंवा रोमांचक भाग ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. वस्तुस्थिती अशी आहे की ती सर्वात कमी महत्त्वाची गोष्ट आहे. खरं तर, जेव्हा आपल्याला समाधीची अनुभूती होते, तेव्हा कुंडलिनी आपोआप जागृत होते. आपल्याला त्यासाठी प्रयत्न करावे लागत नाहीत. तुम्ही सर्वांनी हे जाणून घ्यावे अशी माझी इच्छा आहे की, जेव्हा तुम्ही ध्यान करत असता, तेव्हा तुमची कुंडलिनी एका उच्च पातळीवर असते. आम्ही कदाचित तुम्हाला सांगणार नाही आणि तुम्हाला कदाचित त्याबद्दल कळणार नाही. त्याने काही फरक पडत नाही. आणि आपण कुंडलिनी जागृत करण्यासाठी कोणत्याही विशेष तंत्राचा सराव करत नाही. त्याची गरज नाही. म्हणूनच, ह्या ध्यान मार्गातील साधना ही एक उच्च प्रकारची साधना आहे. साधनेचा हा प्रकार अनेकांना माहीत नाही. फक्त ऋषींना माहीत आहे, कारण त्यांनी ह्या पृथ्वीला सत्य युगात प्रवेश करताना अनेकदा पाहिले आहे. ते म्हणतात, "काही काळानंतर, जेव्हा आपण सत्य युगात आणखी पुढे जाऊ, तेव्हा कोणत्याही प्रकारच्या साधनेची गरज राहाणार नाही." कोणतीही साधना करण्याची गरज राहाणार नाही कारण तुम्ही प्रकाश आहात ह्याची तुम्हाला जाणीव होईल. मग, प्रयत्न करण्याची काय गरज आहे? साधना म्हणजे प्रयत्न करणे होय. कोणतेही प्रयत्न करण्याची गरज राहाणार नाही, कारण तुम्ही प्रकाश बनाल. आपण हे समजून घेऊया. आज माझा एकमेव मुद्दा हा आहे: समजून घेण्याच्या सध्याच्या पातळीवरून, शोध घेण्याच्या सध्याच्या पातळीवरून आपण वरच्या पातळीवर जाऊया. इथली प्रत्येक कृती ही, आम्ही जेव्हा कठोर असतो तेव्हा देखील, प्रेमाची कृती असते. आम्हाला कठोर व्हावे लागते, जेणेकरून तुम्ही वरच्या पातळीवर जाल. तुम्ही ह्या गोष्टी समजून घ्याव्या अशी माझी इच्छा आहे. इथे, ऋषींच्या ह्या केंद्रात फक्त प्रेमच आहे.

नेहमी लक्षात ठेवा, आम्ही प्रत्येक गोष्ट खूप गांभीर्याने घेतो. एक व्यक्ती म्हणते, "नाही, मी ध्यान करू शकत नाही, मी माझ्या परीने पूर्ण प्रयत्न केले आहेत. मला प्रेरणा मिळत नाही." ह्या समस्येचा किंवा परिस्थितीचा देखील आम्ही आदर करतो आणि समजून घेण्याचा प्रयत्न करतो. इथे कोणत्याही गोष्टीची चेष्टा केली जात नाही, कोणत्याही गोष्टीची खिल्ली उडवली जात नाही. तुम्ही हे समजून घ्यावे अशी माझी इच्छा आहे. ■

# श्री जयंत देशपांडे यांच्या व्याख्यानातील उतारे

संकलन : शोभा राव, अनुवाद : सुनिता देशपांडे

१२–०६–२०२२

आज पुन्हा एकदा, आपल्या शरीरसंस्थेबद्दल आपल्याजवळ जी माहिती आहे, त्याची परत उजळणी करूया. ही शरीरसंस्था, जी परमेश्वराकडून मिळालेली महान देणगी आहे, पाच देहांनी मिळून बनलेली आहे. आपला पहिला देह म्हणजे आनंदमय कोश, हा आपल्याला परब्रह्मलोकात देण्यात आला. या ठिकाणी, म्हणजे या भूतलावर येण्यासाठी जेव्हा आपण आपला प्रवास सुरू केला, तेव्हा तो आपल्याला देण्यात आला होता. आपला आत्मा आनंदमय कोशात राहत असतो. त्यानंतर दुसरा देह म्हणजे बुद्धी किंवा विज्ञानमय कोश, हा आपल्याला देवीलोकात मिळाला. देवीलोकातून पुढे शिवलोकात प्रवेश करण्यापूर्वी आपल्याला हा देह देण्यात आला होता. मग आपला तिसरा देह, म्हणजे आपलं मन किंवा मनोमय कोश हा आपल्याला ब्रह्मलोकात देण्यात आला. जेव्हा आपण इथे जन्म घेतला, तेव्हा आपल्याला हे भौतिक शरीर मिळाले. आपल्याला सूर्याकडून आणखी एक शरीर मिळाले – प्राणमय कोश.

तर आपल्याला हे पाच देह मिळालेले आहेत. प्रत्येक देह एक स्वतंत्र अस्तित्व असतं आणि प्रत्येकाला त्याची स्वतःची प्रज्ञा असते. आनंदमय कोश हा मुठीच्या आकाराचा असतो. तो आपल्या छातीच्या मध्यभागी असतो. त्याचा आकार खरंतर इतका छोटा असतो, पण त्याच्या आत जणू एक ब्रह्मांडच असते, असे म्हणता येईल. गुरुजी सांगत असत की, आनंदमय कोशाच्या आत प्रचंड मोठे अवकाश आहे. भौतिक देह हा एक एकक आहे आणि सूक्ष्म देह हा दुसरा एकक आहे. सूक्ष्म देह हा भौतिक देहापासून वेगळा होऊन भौतिक विश्वात प्रवास करू शकतो. एक रुपेरी दोरी सूक्ष्म देहाला भौतिक देहाशी जोडत असते. जेव्हा आपण सूक्ष्मात प्रवास करतो, तेव्हा ही दोरी ताणली जाते आणि दोन्ही देहांमध्ये संपर्क बनवून ठेवते. मनामध्ये चेतनेचे तीन थरं असतात – जागृत, अर्धजागृत आणि अजागृत किंवा सुषुप्त थर. सुषुप्त मन हे एखाद्या कोठारासारखे असते. ह्यात ऊर्जा साठवता येतात आणि आपल्या गतजन्मांच्या आठवणी सुद्धा साठवलेल्या असतात. आपल्या मनात सात चक्रं असतात. मूलाधार चक्र आपल्याला भूलोकात मिळाले आहे आणि इतर चक्र उच्च लोकांतून मिळाले आहेत.

मनोमय कोश, विज्ञानमय कोश आणि प्राणमय कोश हे थेट त्यांच्या स्रोतापासून ऊर्जा ग्रहण करू शकतात. उदाहरणार्थ मन हे ब्रह्मलोकातून ऊर्जा प्राप्त करू शकतं. प्राणमय कोश हा सूर्यातून ऊर्जा प्राप्त करत असतो आणि विज्ञानमय कोश हा देवीलोकातून ऊर्जा प्राप्त करतो. प्राणमय कोशात नाड्या असतात. नाड्यांच्या तीन प्रमुख प्रणाल्या असतात – इडा, पिंगला आणि सुषुम्ना. आपल्या शरीरव्यवस्थेत ७२,००० नाड्या असतात. आपल्याला माहीत आहेच की आपल्या शरीरव्यवस्थेत ७२ प्रकारच्या कुंडलिनी ऊर्जा असतात. ७२,००० नाड्या आणि ७२ प्रकारच्या कुंडलिनी ऊर्जा ह्यांच्यामधे एक संबंध आहे, पण आपल्याला त्याच्याबद्दल जास्त माहीत नाही. आपल्याला माहीत आहे की, मूलाधारामध्ये कुंडलिनी ऊर्जा असते. ही ऊर्जा सुषुम्ना नाडीतून वर सरकते आणि सहस्रारापर्यंत पोहोचते. जेव्हा आपण आध्यात्मिक प्रगती करतो, तेव्हा तसे आपोआपच घडते.

आनंदमय कोश किंवा आत्मिक देह हा ऊर्जा आणि ज्ञान साठवू शकतो. तो परब्रह्मलोकातील वातावरण म्हणजेच आनंद सोबत बाळगत असतो. त्याशिवाय आनंदमय कोशात परमेश्वराच्या ऊर्जा असतात. त्या सुप्त अवस्थेत असतात. आनंदमय कोशात आदिशक्तीच्या, भगवान महाविष्णूंच्या, भगवान शिवांच्या आणि ब्रह्मदेवांच्या ऊर्जा असतात. या ऊर्जा सुप्त स्वरूपात असतात. म्हणजे जणू परमेश्वरच आपल्या सोबत, आत्म्यासोबत प्रवास करत असतो. तो आपला शाश्वत सोबती असतो. आनंदमय कोशातील या ऊर्जांचा एक गाभा असतो. हा गाभा एक रूप सुद्धा घेऊ शकतो. हा गाभा म्हणजे आत्मा नव्हे. आपण आत्मा आहोत. आपण त्या महान प्रकाशाचा एक कण आहोत. पण आपल्या आनंदमय कोशातील ऊर्जांचा गाभा हा आत्म्यापासून वेगळा असतो. या गाभ्याला सुद्धा मत असतं. ते मत म्हणजेच आपलं अंतःकरण होय. आपण म्हणू शकतो की, आपलं अंतःकरण म्हणजे परमेश्वराचं मत होय, त्याचा आवाज होय. परमेश्वराचा सल्ला, त्याचा दिव्य विवेक हा आपल्यासाठी नेहमीच उपलब्ध असतो, आणि तरीही आपल्याला, म्हणजे आत्म्यांना इच्छास्वातंत्र्य असतं. आपल्या अंतःकरणाचं ऐकायचं किंवा नाही, हे इच्छास्वातंत्र्य आपल्याला नेहमीच असतं. त्यामुळे असं शक्य आहे की, आपण परमेश्वराचं न ऐकता दुसऱ्या आवाजाचं ऐकू. हा दुसरा आवाज असतो आपल्या अहम्चा. आपला अहम् ही आपल्या शरीरप्रणालीत असणारी आणखी एक प्रज्ञा असते. आपला अहम् हा आपल्या शरीर, मन आणि बुद्धीची एकत्रित प्रज्ञा असतो. शेवटी निर्णय हा आत्म्याला घ्यावा लागतो. आत्म्याला वेगवेगळ्या प्रज्ञांकडून वेगवेगळे सल्ले मिळत असतात, पण शेवटी निर्णय त्यालाच घ्यावा लागतो. म्हणूनच आपल्या कर्मांची जबाबदारी ही आपल्यालाच घ्यावी लागते किंवा आपलीच असते. आपल्या कर्मांची फळं आपल्यालाच भोगावी लागतात. अर्थात आपली शरीरप्रणाली आपल्याला मर्यादित बनवते. असे शक्य आहे की, जोपर्यंत आपण प्रकाशाशी पूर्णपणे संरेखित होत नाही, तोपर्यंत आपण आपल्या अंतःकरणाकडे दुर्लक्ष करू आणि आपल्या शरीरप्रणालीतील इतर सल्ल्यांचे ऐकू. असे शक्य आहे.

सर्वसाधारणपणे असा समज आहे की, अहम् हा खूप नकारात्मक असतो. पण तो नकारात्मकच असला पाहिजे असे आवश्यक नाही. अहम्, ही एक प्रज्ञा आहे जिच्याजवळ मर्यादित विवेक आहे, इतकेच. पण अहम् नकारात्मकच असतो असं नाही.

मी या पूर्वी सांगितल्याप्रमाणे आपल्याजवळ असलेल्या या प्रज्ञांशिवाय आपल्या शरीरप्रणालीत परमेश्वराचा एक अव्यक्त भाग सुद्धा असतो. हा अव्यक्त भाग आनंदमय कोशाला घेरून असतो. या अव्यक्त भागाला चिदाकाश सुद्धा म्हणतात. याशिवाय आपल्या शरीरप्रणालीत आणखी एक प्रज्ञा असते – छायापुरुष. गुरुजींनी सांगितलं होतं की, छायापुरुष म्हणजे आपलं दैवी सार असतं. छायापुरुष हा स्वतंत्रपणे काम करत असतो. तो एक रूप सुद्धा घेऊ शकतो. या छायापुरुषाजवळ प्रचंड क्षमता असते, अकल्पनीय शक्ती असते. तो आपलं मार्गदर्शन करू शकतो. तो आध्यात्मिक दृष्ट्या आपलं मार्गदर्शन करू शकतो, सर्वप्रकारे आपली मदत करू शकतो. महर्षी अमरांनी सांगितलं होतं की छायापुरुष हा आपल्यासाठी एक पर्वत सुद्धा उचलून आणू शकतो. त्याच्याजवळ इतकी प्रचंड शक्ती असते. पण, तो खूप स्वतंत्र असतो. केवळ आपण म्हणतो म्हणून तो काहीही करत नसतो. तो उगाच आपले म्हणणे ऐकत नसतो. जोपर्यंत आपण आध्यात्मिक प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असतो, तोपर्यंत तो आपली मदत करतो. तो तेव्हापर्यंत आपला मित्र असतो, जोपर्यंत आपण आध्यात्मिक प्रगती करण्याचा प्रामाणिक हेतू मनात ठेवत असतो. जेव्हा आपण शुद्धतेची ठराविक पातळी गाठतो, तेव्हा तो, ती पातळी टिकवून ठेवण्यासाठी आपली मदत करतो. जेव्हा आपण आध्यात्मिकदृष्ट्या प्रगत झाल्यानंतरही मुद्दाम चुका करतो, तेव्हा छायापुरुष आपल्याला दंड सुद्धा देऊ शकतो. तो आपल्याला सर्वात चांगलं ओळखतो, इतर कोणापेक्षाही चांगलं ओळखतो. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्षात ध्यान वर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी इंग्रजी, कन्नड, मराठी आणि हिंदी भाषांमध्ये पोस्टाद्वारे किंवा ई-मेलद्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. मार्गदर्शनासाठी भारतात राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नोंदणी शुल्क २५०० रू. आहे. भारताबाहेर राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नोंदणी शुल्क ४५०० रू. आहे. ह्या शुल्कात मासिकासाठी वार्षिक वर्गणी आणि पाठ्यपुस्तकांची किंमत समाविष्ट आहे.

त्यानंतर, भारतात राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक नूतनीकरण शुल्क २००० रू. आहे. भारताबाहेर राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक नूतनीकरण शुल्क ३५०० रू. आहे. ह्या शुल्कात मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका व प्रश्नांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## महर्षी अमर

सुनील बिसरहळ्ळी, अनुवाद : वैशाली जोशी

महर्षी अमर. हे नाव आपल्यात एक खोल भावना उद्दीपित करणारे आहे. आणि त्यासोबत, आपल्या खोल अंत:करणात काहीतरी सुखदायक, काहीतरी भव्यदिव्य, काहीतरी विशाल असे उत्पन्न होते. प्रेम, विनम्रता आणि कृतज्ञता आपल्या अंत:करणातून एखाद्या नदी प्रमाणे प्रवाहित होतात आणि आपल्या सभोवतालच्या सर्व गोष्टींना भरून टाकतात. ही भावना इतकी छान असते की महर्षी अमरांच्या विशालतेच्या तुलनेत आपण स्वत: अत्यंत लहान ठरतो.

अंबरीश वर्मा देसाई, एक राजपुत्र म्हणून त्यांचा जन्म झाला. वयोवर्षे ९ ते १२ त्यांनी ऋषी होण्यासाठी विश्वामित्र महर्षींच्या हाताखाली प्रशिक्षण घेतले. राजेशाहीपासून ते ऋषीत्वाच्या त्यांच्या प्रवासात कठोर प्रशिक्षण आणि चाचण्यांचा समावेश होता. विश्वामित्र महर्षींनी सूक्ष्म जगात त्यांना अमर हे नाव दिले आणि त्यांना ऋषी घोषित केले.

अमर म्हणजे शाश्वत, अंतहीन. आकाशासारखे अंतहीन, अवकाशासारखे अंतहीन. ते व्यक्ती नसून एक व्यक्तिमत्त्व आहेत ज्यांच्यातून विनम्रता, उदारता, परिपूर्णता इत्यादी गुण चमकतात. त्यांनी हे गुण फक्त आत्मसात करून विकसितच केले नाहीत, तर त्यांना पूर्णपणे आचरणात आणले.

एकदा मी गुरुजींना विचारले, "जसे आम्ही तुमच्या सोबत विनोद करतो आणि हसतो, तसे तुम्ही महर्षी अमरांसोबत केले होते का?" ते म्हणाले, "आम्ही त्यांच्या सोबत विनोद केला नाही. ते ध्यान आणि ऋषींच्या बाबतीत इतके गंभीर होते; आम्हाला त्यांची भीती वाटत असे." "भीतीपेक्षा जास्त, आम्हाला त्यांच्याबद्दल भीतीयुक्त आदर वाटत असे." ते म्हणाले, "त्यांच्या सोबत असणे म्हणजे एखाद्या प्रचंड पर्वतासमोर उभे राहण्यासारखे किंवा आकाशाच्या विस्ताराकडे पाहण्यासारखे होते."

महर्षी अमरांचे एक स्वप्न होते. ह्या पृथ्वीला एक स्वर्ग बनवण्याचे. ह्या स्वप्नाने गुरुजींना आणि इतरांना त्यांच्याकडे आणले होते. ह्या स्वप्नानेच आपल्या सर्वांना ह्या मार्गात आणले आहे. एकदा जेव्हा गुरुजींनी महर्षी अमरांना विचारले की, लोकं त्यांच्याकडे कसे आले, ते सहजपणे म्हणाले, "मी तसा संकल्प केला."

महर्षी अमर हे मानसाच्या पाठीशी असलेला प्रकाश आहेत. आपण जे सर्व करतो त्याच्या पाठीशी असलेली शक्ती महर्षी अमर आहेत, मग ते प्रकाश प्रवहन असो, मुलांना शिकवणे असो किंवा ध्यानसाधना असो. त्यांच्या शिवाय ह्यापैकी काहीही शक्य झाले नसते. महर्षी अमर हे फक्त आपले परमगुरूच नाहीत, तर ते आपले ध्येय आहेत, ते एक आदर्श आहेत ज्यापर्यंत पोहोचण्यासाठी आपल्यापैकी प्रत्येक जण प्रयत्नशील आहे. ■

## महर्षी अमर – एक प्रकाश

सुधाकर के. एल., अनुवाद : वैशाली जोशी

"महर्षी अमर आता कुठे आहेत?", तपोनगरातील एका बालकाने एकदा कुतुहलाने गुरुजींना विचारले. त्या मुलाच्या छातीकडे बोट दाखवत गुरुजी म्हणाले, "ते इथे आहेत!"

अनेक प्रसंगी, गुरुजी म्हणाले होते की महर्षी अमर आपल्या सर्वांच्या अंतरंगात आहेत. आणि जयंत सर देखील वारंवार त्याची पुनरावृत्ती करतात, आणि महर्षी अमर आपल्या अंतरंगात उपस्थित असल्याची आपल्याला आठवण करून देत असतात. आणि त्यांच्याकडून आपल्याला हे समजले आहे की, आपल्या जीवनात महर्षी अमरांना प्रकट करणे हीच आपली साधना आहे. जेव्हा आपण त्यांना पूर्णपणे प्रकट करू शकू, तेव्हा आपण सत्य युगात किंवा प्रकाश युगात जगू! वास्तविक सत्य युग खूप पुढे असेल, पण त्यांना पूर्णपणे प्रकट करून, आपण वैयक्तिकरित्या आत्ता सत्य युगात जगणे सुरू करू शकतो. आपल्या सर्वांसाठीच ही एक अद्‌भुत संभावना आहे!

महर्षी अमर, मास्टर 'व्ही' यांना प्रकाश म्हणून संबोधत असत. आणि गुरुजींनी महर्षी अमरांचा प्रकाश असा उल्लेख केला. महर्षी अमर हे नेहमीच आपले मार्गदर्शक प्रकाश राहिले आहेत. महान गुरू जेव्हा मानवी देहात राहतात, तेव्हा सामान्यत: त्यांच्या जीवनात प्रकाशाचे एक किंवा दोन पैलू ठळकपणे दिसून येतात, जसे की, येशू ख्रिस्तांच्या जीवनात प्रेम ठळकपणे दिसून आले होते. महान गुरुंमध्ये प्रकाशाचे सर्व पैलू असतात, पण काही पैलू प्रामुख्याने प्रकट होतात. महर्षी अमरांच्या जीवनात विनम्रता आणि समर्पणवृत्ती ठळकपणे दिसून आली. गुरुजी त्यांचे वर्णन विनम्रतेचे मूर्त स्वरूप असे करीत असत. एक महर्षी असूनही ते स्वत:ला ऋषींचा कार्यकर्ता म्हणत असत! ऋषींना असलेले त्यांचे समर्पण पूर्ण होते आणि त्यांनी ऋषींच्या सर्व सूचनांचे शब्दश: पालन केले.

त्यांनी शक्य तितक्या सोप्या पद्धतीने आपल्याला आवश्यक असलेले ज्ञान आणि मार्गदर्शन दिले. "Descent of Soul" ह्या लहानशा पुस्तकात, जे एका तासापेक्षाही कमी वेळात वाचून पूर्ण करता येते, सर्व उपनिषदांचे सार आहे! त्यांनी आपल्याला एक साधी सूचना दिली – 'ध्यान करा आणि सकारात्मक व्हा.' त्यांनी आपल्याला जाणीव करून दिली की, प्रकाशाकडे नेणारे मार्ग आणि प्रकाशाचे मार्ग हे नेहमीच सरळसोपे असतात! ■

## प्रश्नोत्तरे

(गुरुजी कृष्णानंद)

संकलन : शोभा राव, अनुवाद : वैशाली जोशी

**प्र: अनेक पुस्तकांमध्ये लिहिलेले असते की ध्यान करणे म्हणजे एकाग्रता आणणे होय. पण तुम्ही आम्हाला शिकवत आहात की ध्यान करणे म्हणजे एकाग्रता आणणे नव्हे. कोणते बरोबर आहे?**

उ: ध्यान करणे म्हणजे एकाग्रता आणणे नव्हे. ध्यान ही एकाग्रतेच्या पलीकडील प्रक्रिया आहे. माझ्या 'How to Meditate' ह्या पुस्तकात मी ह्याचा स्पष्ट खुलासा केला आहे.

**प्र: मला ते स्वीकारणे अवघड जाते आहे. मी माझी साधना पुढे कशी चालू ठेवावी?**

उ: मी एका महान ऋषींच्या, महर्षी अमरांच्या हाताखाली शिकलो आहे, ज्यांनी आपल्याला ध्यानाचे शास्त्र दिले. पण तुम्ही माझे स्पष्टीकरण मान्य करण्याची गरज नाही. तुम्ही स्वत: प्रयोग करून पाहा आणि अनुभव घ्या.

**प्र: तुम्ही असे कसे म्हणता की ध्यान हे शास्त्रोक्त आहे?**

उ: तुम्ही कधी ध्यान केले आहे का?

नाही.

उ: मग, आता ही फक्त चर्चा आहे. त्याने फारशी मदत होणार नाही. लोकं सामान्यत: ह्या कल्पनेला धरून राहतात की त्यांना जे दिसतं, त्यावरच त्यांनी विश्वास ठेवला पाहिजे आणि फक्त तेच शास्त्रोक्त असते. ध्यानामध्ये सूक्ष्म प्रक्रिया, अज्ञात ऊर्जा आणि इतर आयाम यांचा समावेश असतो. व्यक्तीने ते प्रत्यक्षात अनुभवले पाहिजेत. योगासनांप्रमाणे त्यांचे प्रात्यक्षिक दाखवता येत नाही. ध्यान हे योगशास्त्राचा एक भाग आहे, जे हजारो वर्षांमध्ये अत्यंत विकसित झाले आहे.

**प्र: आपल्या धर्माप्रमाणे?**

उ: नाही. धर्म हा नंतर आला. ध्यानाचा धर्माशी काहीही संबंध नाही. ते पूर्णपणे शास्त्रोक्त आहे. ती एक आध्यात्मिक प्रक्रिया आहे.

**प्र: साधनेचा आणि ध्यानाचा उद्देश काय आहे?**

उ: सर्व खोटे ज्ञान नष्ट करणे, आणि शुद्ध आणि उच्च ज्ञान थेट प्राप्त करण्यासाठी स्वत:ला तयार करणे.

**प्र: एक व्यक्ती योगासनांच्या वर्गाला गेली. तिला सांगण्यात आले की तिने आधी यम आणि नियमांचा सराव करावा आणि मग ध्यान करणे सुरू करावे. ते बरोबर आहे का?**

उ: नाही. ज्या व्यक्तीने असे म्हटले तिला माहीत नाही. आम्ही सुरुवातीपासून समजावून सांगत आलो आहोत की आपण तडक यम–नियमांचा सराव करू शकत नाही. आपण जर तसे करू शकलो, तर आपण ध्यान करण्याची गरज नाही! हे शक्य नाही. म्हणून आपण ध्यान करतो, बळ मिळवतो आणि मग यम–नियमांचा सराव करतो. हे स्पष्टपणे समजून घेऊन आपण ध्यानाचा सराव करत आहोत.

**प्र: दररोज एका ठराविक वेळी ध्यान करणे आणि वेगवेगळ्या वेळी ध्यान करणे ह्यात काय फरक आहे?**

उ: जेव्हा आपण एका ठराविक वेळी ध्यान करतो, तेव्हा आपल्याला ऋषींच्या उपलब्धतेचा फायदा होतो. ध्यानाचा प्रभाव हा नेहमीच चोवीस तास राहतो. जेव्हा आपण एका निश्चित वेळी ध्यान करतो, तेव्हा त्या प्रभावाचे नूतनीकरण होते आणि आपल्या शरीरप्रणालीत एक लय निर्माण होते.

**प्र: मी एक वर्ष ध्यान करू शकलो नाही. पण तुम्ही दिलेल्या विशेष मंत्राचा मी जप करतो आहे. ते ठीक आहे का?**

उ: नाही, ते ठीक नाही. ध्यान करणे गरजेचे आहे. ध्यान करून मग त्या विशेष मंत्राचा जप करणे आवश्यक होते.

**प्र: कापूर जाळल्यानंतर, जर मी पंखा चालू करण्यासाठी किंवा इतर काही कारणाने जागेवरून उठलो, तर आध्यात्मिक क्षेत्राचा ऱ्हास होतो का?**

उ: नाही. ते बराच काळ राहते.

**प्र: ध्यान करताना मी कशाची अपेक्षा करावी?**

उ: कशाचीही नाही. ध्यानादरम्यान, फक्त मौन.

**प्र: ध्यान करत असताना कशाची अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे का?**

उ: अपेक्षा ह्या आध्यात्मिक प्रगतीच्या मार्गात येतात.


**प्र: आपल्या ध्यानाचा जगावर काही परिणाम होतो का?**

उ: होय. ध्यानामुळे जगात शांती आणणाऱ्या अनेक आध्यात्मिक प्रक्रियांना गती मिळण्यास मदत होते आहे. ■


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Light Body & Other Realities | 100/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| Master-Pupil Talks - Vol 2 | 75/- |
| iGuruji Vol 1,3,4 & 7 | each 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 2 | 150/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 3 & 4 | each 200/- |
| Guruji Speaks Part - I & II | each 200/- |
| Guruji Speaks (Vol 3) | 150/- |
| Guruji Speaks (Vol 4) | 250/- |
| Guruji Speaks (Vol 5 & 7) | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 & 2 | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 3 | 150/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences - Vol 1 & 2 | each 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| Quotes from the Rishis - Vol 1 & 2 | each 100/- |
| Pyramid Revelations | 100/- |
| Thus Spoke Guruji Krishnananda - Vol 1 & 4 | each 200/- |
| Thus Spoke Guruji Krishnananda - Vol 2 & 3 | each 250/- |
| ಬೆಳಕಿಗೆ ಬಾಗಿಲುಗಳು | 150/- |
| ಋಷಿಗಳಿಂದ ಬಂದ ಜ್ಞಾನ | 150/- |
| ಋಷಿಗಳಿಂದ ಬಂದ ಜ್ಞಾನ – ಭಾಗ 2 | 150/- |
| ಗುರು–ಶಿಷ್ಯರ ಸಂಭಾಷಣೆ | 60/- |
| ಐ–ಗುರೂಜಿ ಭಾಗ 1 | 150/- |
| ಐ–ಗುರೂಜಿ ಭಾಗ 2 | 120/- |
| ಹೊಸ ಯುಗದ ವಾಸ್ತವಗಳು | 120/- |
| ಉನ್ನತ ಸಂಪರ್ಕಗಳು | 100/- |
| ಅನಿಸಿಕೆಗಳು | 120/- |
| ಧ್ಯಾನ ಮಾಡುವುದು ಹೇಗೆ | 50/- |
| ಧ್ಯಾನ ಯೋಗ | 50/- |
| ಆತ್ಮದ ಅವರೋಹಣ | 50/- |
| ಶಂಬಲ ನಿಯಮಗಳ ಅಭ್ಯಾಸ | 50/- |
| ಆಧುನಿಕ ಋಷಿಯೊಬ್ಬರ ಅತೀಂದ್ರಿಯ ಸಾಹಸಗಳು | 50/- |
| ಗುರೂಜಿ ನಾ ಕಂಡಂತೆ | 30/- |
| ಬೆಳಕಿನಲ್ಲಿ ಬದುಕುವುದು | 10/- |
| ಬೆಳಕು | 10/- |
| ದೈವಸಾಕ್ಷಾತ್ಕಾರಕ್ಕೆ ರಾಮಕೃಷ್ಣರ ಮಾರ್ಗದರ್ಶನ | 250/- |
| ಕಾವ್ಯಕಂಠ ವಸಿಷ್ಠ ಗಣಪತಿ ಮುನಿಗಳು | 100/- |
| ಆನೇಕಲ್ಲಿನ ಅಪರೂಪದ ವ್ಯಕ್ತಿಗಳು | 120/- |
| ಬೆಳಕಿನ ಶರೀರ ಮತ್ತು ಇತರ ವಾಸ್ತವಗಳು | 100/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| गुरु–शिष्य संवाद (Marathi) | 60/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |
| आत्मा का अवतरण (Hindi) | 50/- |
| தியானம் செய்வது எப்படி | 50/- |
| ஒளியின் வாயில்கள் | 200/- |
| தியான யோகம் | 50/- |
| ஆத்மாவின் அவரோகணம் | 50/- |
| நவீன ரிஷி ஒருவரின் சூக்ஷ்ம சாகசங்கள் | 50/- |
| சம்பலா நியமங்களின் அப்பியாசங்கள் | 50/- |
| ధ్యానం చేయ్యడం ఎలా | 50/- |
| కాంతికి ద్వారములు | 100/- |

Published: 21st of Every Month. RNI. No. KARMAR/2008/27314 Regd. Postal Regn. No. KRNA/BGE/1125/ 2020-2022
Date of posting Newsletter-25th or 27th or 29th of Every Month. Posted at Bangalore PSO, Bg-560026 No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९ – २०१२)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### तपोनगर

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

## आध्यात्मिक अनुभव

संकलन : शोभा राव, अनुवाद : गुरुराज कानाडे

मी हरतऱ्हेच्या परिस्थितीत शांत व सकारात्मक असते. आता मला माझ्या कामाबाबत आत्मविश्वास वाटतो आणि बऱ्याच ठिकाणी मला दैवी आशीर्वादाचा लाभ झाल्याची जाणीव होते.

– आशा जी.

मी शांत व स्थिरचित्त असल्याचे मला जाणवते. कोणालाही क्षमा करणे मला सहज शक्य आहे. ध्यान करताना माझी समाधी लागते व त्यावेळी मला काळाचा व साधना तंत्राचा पूर्ण विसर पडतो. मी नेहमी झोपण्यापूर्वी प्रकाशाला शुभ रात्री म्हणते व आम्ही दोघे एकमेकांसोबत गुजगोष्टी करतो. मी जास्त शांत व स्थिरचित्त तर झाले आहेच पण जीवन प्रवाहासोबत देखील अगदी सहजपणे वाटचाल करते आहे.

– प्रतिभा पटेल

मी ७ मे रोजी जवळजवळ ११ वर्षांनी बंगलोरला आले होते. या अगोदर २०१०, २०११ ला तपोवनात आल्या आल्या गुरुजीच सर्वात अगोदर भेटले होते. आता येताना मनात विचार होता की आता तर गुरुजी नाहीत. प्रथम मी कॉस्मिक टॉवर मध्ये ध्यानासाठी गेले. तिथे मी ३० मिनिटे ध्यान केले. ध्यानासाठी बसल्याबरोबर फिकट निळा प्रकाश दिसत होता. सप्तर्षी प्राणायामाला सुरुवात केल्याबरोबर प्रकाश दिसायला लागला. जवळजवळ १५ मिनिटे प्रकाश दिसत होता. त्यामुळे प्रकाश रूपात गुरुजींचे दर्शन झाले असे मला वाटते. या गुरुकृपेसाठी मी कृतज्ञ आहे.

– क्रांती ढमढेरे

बंगलोर येथे २५–०५–२०२२ रोजी जयंत सर व गुरुजींच्या आशीर्वादाने माझी हर्नियाची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. त्यादिवशी संध्याकाळी मी माझ्या दोन्ही मुलींना शहाळं आणण्यासाठी पाठवलं. खरेतर त्या दोघींना मला एकटं सोडून जायचं नव्हतं. त्यानंतर मी डोळे मिटून काही वेळ विश्रांती घेतली. जेव्हा मी माझे डोळे उघडले तेव्हा मला जाणवले की गुरुजी कृष्णानंद बाजूच्या खुर्चीवर बसले आहेत आणि संपूर्ण खोली प्रकाश किरणांनी भरली आहे. साधारण २० मिनिटांनी माझ्या मुली परतल्या आणि त्यांनी मला विचारलं, "कशामुळे तू इतकी आनंदी दिसत आहेस?" मी त्यांना सांगितलं, "गुरुजी कृष्णानंद आले होते. त्यांनी मला आशीर्वाद दिले!" मला एवढंच म्हणायचं आहे की गुरुजी आपल्या सोबत नेहमीच असतात!! हे सत्य आहे!!

– श्रीलतांगी

आम्ही माझ्या आईच्या श्राद्धाच्या कार्यक्रमाकरिता मंदिरात गेलो होतो. बरेचसे विधी होते त्यामुळे मला तिची आठवण काढायला देखील वेळ मिळाला नव्हता. सर्व विधी उरकल्यानंतर, जेवणाची पानं वाढली जाण्यापूर्वी, मला थोडासा वेळ मिळाला. मी डोळे मिटून बसलो. मी परब्रह्माची प्रार्थना करून त्यांच्याकडून ऊर्जा गोळा केल्या. मग मी पितृदेवतांचे आवाहन केले व त्या ऊर्जा माझ्या आईपर्यंत पोहचवण्याची त्यांना विनंती केली. त्यावेळी एकाएकी, माझ्या समोर अतिशय सुंदर दोन हात मला दिसले. त्यामधील डाव्या हातावर अतिशय मुलायम व अतिसुंदर हिरवट निळ्या रंगाचे उपरणे गुंडाळले होते. त्यांनी त्या ऊर्जा स्विकारल्या व ते हात अंर्तधान पावले.

– सुनिल बीसरहळ्ळी

अलीकडे मला अनेक मोठी नुकसानं सोसावी लागली, अर्थात मला त्याचे वाईट वाटले पण मला त्यामुळे मानसिक दडपण मात्र अजिबात आले नाही. जेव्हा अगदी विश्वासू व दीर्घकाळ घरात काम करणाऱ्या नोकरांकडून अगदी शिताफीने सोन्या व चांदीची चोरी होते, तेव्हा ते सहन करणे सोपे नाही, पण मी ह्या सर्व गोष्टी पूर्णपणे सोडून देण्यास तयार आहे. पण काय आश्चर्य! ह्या घटनेला माझ्याकडून कसलीच प्रतिक्रिया देण्यात आली नाही. मी त्यांना क्षमा केली आहे व त्यानंतर माझा जीवनक्रम नेहमी प्रमाणे चालू आहे. ह्यातून मी काय तो धडा घेतला आहे. मला वाटतं की जीवनाचा अर्थ फार मोठा आहे आणि माझ्या जीवनात जे काही घडलं आहे ते घडणारच होतं. माझ्यातील शांतता व स्थिरचित्तता इतकी बळकट आहे की ह्या घटने बाबत मी एक चकार शब्दही काढला नाही आणि झालेल्या सर्व नुकसानीचा स्वीकार केला आहे. माझ्या मनात खोल कोठेतरी मी गहन शांती, अविचलितता व निश्चलता अनुभवते आहे.

ह्या गोष्टीची मला पूर्ण जाणीव आहे की ह्या विश्वाकडे माझ्या समस्या सोडवण्याचा असा मार्ग आहे ज्यात नेहमी माझेच हित दडलेले असते. मला असेही वाटते की हे विश्व माझे नेहमी मार्गदर्शन करीत असते व माझ्या अडचणी सोडवण्याकरिता योग्य विचारांची साथ मला देत असते.

– रेबोनी रे

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban - 560077 and
Printed at M/s. ART PRINT, 719/A, West of Chord Road, 2nd Stage, Rajajinagar, Bangalore - 560086. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande